# बातमी

अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, भारत सरकार यांच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांनुसार मा.पंतप्रधान यांच्या १५ कलमी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच राज्यातील अल्पसंख्यांक समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नतीसाठी तसेच स्थानिक अल्पसंख्याकांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नव्याने जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समित्या गठीत करण्यात येणार आहे. सदर समितीमध्ये परभणी जिल्ह्यांतर्गत अल्पसंख्याकांसाठी काम करणा-या दोन (०२) नामवंत अशासकीय स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनीधींनी सदस्य म्हणून नियुक्ती मिळण्यासाठी जिल्हास्तरावरुन अर्ज / प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

परभणी जिल्ह्याकरिता गठीत करण्यात येत असलेल्या जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समितीमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती मिळणेसाठी अल्पसंख्याकांसाठी काम करणा-या इच्छूक असलेल्या नामवंत अशासकीय स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनीधींनी १) संस्थेचे आयुक्त धर्मदाय किंवा इतर प्राधिकरण यांनी प्रदान केलेले नोंदणी प्रमाणपत्र. २) संस्थेचे धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त झालेले प्रमाणत्र. ३) संस्थेचे घटना व उद्देश ४) संस्थेचे मागील तीन वर्षाचे जमा खर्चाचे लेखा परिक्षण अहवाल. ५) संबंधित संस्था यांच्या सदस्यांमध्ये कोणतेही न्यायिक वाद नसल्याबाबत रु.१००/- च्या अर्धन्यायिक कोर्ट फी स्टॅम्पपेपरवर Notarized प्रमाणपत्र. ६) संस्थेचे प्रतिनीधी हे परभणी जिल्ह्यातील रहिवासी असणे तसेच इतर कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

वरीप्रमाणे अटींची पूर्तता करणा-या अल्पसंख्याकांसाठी काम करणा-या नामवंत अशासकीय स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनीधींनी परभणी जिल्ह्याकरिता गठीत करण्यात येत असलेल्या जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समितीमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती मिळणेसाठी दिनांक २५/०७/२०१८ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत अल्पसंख्याक विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे अर्ज व वरील नमूद सर्व कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी यांचेकडून करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी परभणी

D:\ जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समिती